नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २७३ Issue - 273 | वार रविवार दि. २२ फेब्रुवारी २०२६ Blow- Sunday Date 22 February 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# सरपंच पाहणार प्रशासक म्हणून कारभार

## मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसाठी राज्य सरकारचा मोठा निर्णय; प्रशासनातील अडचणी टाळण्यासाठी बदल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींबाबत (चरहरीरिहींीर त्र्वीरा झरपलहरूरीं) राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेत प्रशासकपदाचा गुंता सोडवला आहे. आता ज्या ग्रामपंचायतींची मुदत २८ फेब्रुवारीपर्यंत संपत आहे, त्या ठिकाणी विद्यमान सरपंचालाच प्रशासक म्हणून नेमले जाणार आहे. यामुळे ग्रामपातळीवरील प्रशासनात सातत्य राहणार असून अचानक बदलामुळे निर्माण होणारी पोकळी टळणार आहे.

याआधी जानेवारी महिन्यात काढलेल्या परिपत्रकानुसार, २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला होता. मात्र, राज्यातील ग्रामपंचायतींची मोठी संख्या आणि विस्तार अधिकाऱ्यांची मर्यादित उपलब्धता लक्षात घेता प्रशासनासमोर अडचणी निर्माण होण्याची शक्यता होती. त्यामुळे सरकारने सुधारित निर्णय घेतला आहे.

सरपंचच प्रशासक, उपसरपंच आणि सदस्यांची समिती मदतीला

नव्या निर्णयानुसार, ग्राम पंचायतीची मुदत संपण्याच्या दिवसापर्यंत जे सरपंच पद-ावर असतील, त्यांनाच प्रशासक म्हणून नेमण्यात येईल. त्यांच्या मदतीसाठी विद्यमान उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांची प्रशासकीय समिती स्थापन केली जाणार आहे. यामुळे स्थानिक पातळीवर निर्णय प्रक्रिया सुरळीत राहण्यास मदत होईल आणि नव्या व्यक्तींना प्रशासन समजून घेण्यासाठी लागणारा वेळ वाचेल.



प्रशासकाचा कालावधी किती?

प्रशासक आणि प्रशासकीय समितीचा कालावधी त्यांच्या नेमणुकीपासून सहा महिने किंवा संबंधित ग्राम पंचायतीची निवडणूक पूर्ण होईपर्यंत, जे आधी होईल तेवढा राहणार आहे. हा तात्पुरता उपाय असून निवडणूक प्रक्रिया पूर्ण होताच नियमित निवडून आलेले पदाधिकारी कारभार स्वीकारतील.

२८ फेब्रुवारीपर्यंतच लागू निर्णय

राज्य सरकारने जारी केलेल्या परिपत्रकानुसार हा निर्णय सध्या २८ फेब्रुवारीपर्यंत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसाठीच लागू राहणार आहे. या कालावधीत प्रशासक आणि प्रशासकीय समिती नेमण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे असतील.

प्रशासनातील अडचणी टाळण्यासाठी बदल

राज्यातील मोठ्या संख्येने ग्रामपंचायतींची मुदत संपत असल्याने सर्वत्र बाहेरील प्रशासक नेमणे व्यवहार्य ठरणार नव्हते. पंचायत समित्यांमधील विस्तार अधिकाऱ्यांची मर्यादित संख्या ही देखील मोठी अडचण होती. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन सरकारने स्थानिक स्तरावरच विद्यमान सरपंच आणि त्यांच्या टीमकडे तात्पुरता कारभार सोपवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रशास-नात सातत्य, पारदर्शकता आणि वेग राखला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ नवे जामीनदार

## आरएसएस मानहानी प्रकरणात राहुल गांधी भिवंडी कोर्टात हजर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आज (२१ फेब्रुवारी) भिवंडी कोर्टात हजेरी लावली. २०१४ मधील आरएसएस मानहानी प्रकरणात ते अतिरिक्त सत्र न्यायालयात हजर झाले. यापूर्वी माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील यांनी राहुल गांधींच्या जामिनासाठी जामीनदार म्हणून काम पाहिले होते. मात्र त्यांच्या निधनानंतर आता राहुल गांधी यांचे जामीनदार काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ असतील. राहुल गांधी दिल्लीहून एअर इंडियाच्या विमानाने मुंबईत आले. मुंबईहून ते रस्त्याने भिवंडीला न्यायालयात पोहोचले. त्यांनी मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालयात हजर राहत नवा जामीनदार दिला.



राहुल गांधी यांना काळे झेंडे दाखवले

दरम्यान, राहुल गांधी यांना भाजप कार्यकर्त्यांकडून काळे झेंडे दाखवण्यात आले. त्यांना वेळीच पोलिसांनी हस्तक्षेप करत रोखले. राहुल गांधी यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर ठाणे पोलिसांनी न्यायालय परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. खबरदारी म्हणून न्यायालयाच्या १०० मीटर परिसरातील दुकानेही बंद ठेवण्यात आली. सुनावणीनंतर राहुल गांधी पुन्हा रस्त्याने मुंबई विमानतळाकडे रवान झाले. भिवंडी कोर्टातून बाहेर पडल्यानंतर राहुल गांधी यांच ताफा भिवंडी शहरातून बाहेर पडत असताना भिवंडी शहरातील नागरिकांना हात दाखवत अभिवादन केले.

काँग्रेस नेत्यांकडून राहुल यांचे स्वागत : दरम्यान, काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या स्वागतासाठी मुंबई विमानतळावर उपस्थित होते. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, नसीम खान यांनी राहुल गांधी यांचे स्वागत केले.

खासदार सुरेश म्हात्रेंनी घेतली राहुल गांधींची भेट

दरम्यान, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ मामा यांनी राहुल गांधी यांची भेट घेतली. १२ वर्षे होऊन गेले या घटनेला तरी देखील अजूनही केस सुरू आहे हे दुर्दैव असल्याचे सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी सांगितले.

## पेपर फुटला; बारावीचे फिजिक्स अन् केमिस्ट्रीचा पेपर तासाभरापूर्वीच आला व्हाट्सअपवर, शालेय शिक्षण मंत्र्यांचे चौकशीचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात दहावी-बारावीची परीक्षा कॉपीमुक्त आणि तणावमुक्त वातावरणात पार पडावी म्हणून राज्य मंडळाने शर्थीचे प्रयत्न केलेत. मात्र त्यानंतरही अनेक प्रकार समोर येत आहेत. अशातच नागपुरा-तून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. नागपूरमध्ये चक्क बारावीच्या दोन विषयांचे पेपर फुटल्याची माहितीसमोर आली आहे. नागपूरच्या सदर पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, व्हाट्सअप ग्रुप तयार करून हा सगळा पेपर फोडण्याचा प्रकार सुरू असल्याची पोलिसांना माहिती मिळाली. यात बारावीच्या विज्ञान शाख-ेचे फिजिक्स आणि केमिस्ट्रीचा पेपर परीक्षेच्या तासाभरापूर्वीच व्हाट्सअपवर आल्याची माहिती आहे. गुरुवारी बारावी केमिस्ट्रीचा पेपर होता. मात्र परीक्षेआधी पेपर विद्यार्थ्यांच्या व्हाट्सअप ग्रुपवर आला होता. नागपूर शहरातील सदरच्या सेंट उर्सुला परीक्षा केंद्रावर हा प्रकरण उघडकीस आला आहे.

दरम्यान, सेंट उर्सुला परीक्षा केंद्रावर एक विद्यार्थिनी वारंवार प्रसाधन गृहात जात होती. त्यामुळे केंद्रावरील प्रेक्षकांना संशय आला. यावरून तिची शिक्षकेच्या माध्यमातून झडती घेण्यात आल्यावर एक स्मार्टफोन जप्त करण्यात आला. तो तपासला असता त्यामध्ये एका व्हाट्सअप ग्रुपवर परीक्षा सुरू होण्यापूर्वी पेपर आलेला आढळून आला होता. या प्रकरणी केंद्रप्रमुखांनी सदर पोलिसांना (पान २ वर...)

## ऑस्ट्रेलियाला घरच्या मैदानावरच पराभूत केले, भारतीय रन'रागिणींनी रचला इतिहास




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अ‍ॅडलेड: भारतीय महिला संघ सध्या तिन्ही फॉरमॅटमध्ये मालिका खेळण्यासाठी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे. टीम इंडियाने तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेने दौऱ्याची सुरुवात केली, तिसरा सामना १७ धावांनी जिंकून मालिका २-१ अशी जिंकली. या सामन्यात टीम इंडियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि २० षटकांत ६ गडी गमावून १७६ धावा केल्या.

टीम इंडियाकडून डीळींळ चरपव-हरपर आणि जेमिमा रॉड्रिग्ज या उत्कृष्ट फलंदाज होत्या. स्मृती मानधनाने ५५ चेंडूत ८ चौकार आणि ३ षटकारांसह ८२ धावांची शानदार खेळी केली, तर जेमिमा रॉड्रिग्जने ४६ चेंडूत ५९ धावा केल्या. रिचा घोषनेही १८ धावांची खेळी केली. ऑस्ट्रेलियन महिला संघाकडून अ‍ॅनाबेल सदरलँडने दोन विकेट घेतल्या, तर सोफी मोलिनेक्स आणि किम गार्थने प्रत्येकी एक विकेट घेतली. लक्ष्याचा पाठलाग करताना, ऑस्ट्रेलियन महिला संघाची सुरुवात खराब झाली. जॉर्जिया वॉलच्या रूपात १९ धावांवर त्यांचा पहिला बळी गेला, जी फक्त १० धावांवर बाद झाली. बेथ मूनी देखील फक्त सहा धावा करू शकली. त्यानंतर, ऑस्ट्रेलियन संघाने नियमित अंतराने विकेट गमावत राहिल्या, ज्यामुळे त्यांना भारतीय गोलंदाजांवर कोणताही दबाव आणता आला नाही. ऑस्ट्रेलियाची फलंदाजीची कामगिरी अ‍ॅशले गार्डनरपुरती मर्यादित राहिली, ज्यांनी ५७ धावा केल्या. लक्ष्याचा पाठलाग करताना, ऑस्ट्रेलियन संघ २० षटकांत नऊ गडी गमावून फक्त १५९ धावा करू शकला. टीम इंडियाकडून श्रेयंका पाटील आणि श्री चरणी यांनी गोलंदाजीत उत्कृष्ट कामगिरी केली, त्यांनी प्रत्येकी तीन गडी बाद केले, तर अरुंधती रेड्डीने दोन आणि रेणुका सिंग ठाकूरने एक गडी बाद केला. भारतीय संघाने इतिहास रचला आहे. २०१७ नंतर पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियन महिला संघाचा घरच्या मैदानावर पराभव झाला आहे.

### रोहित पवारांचा दिल्लीतून नवा बॉम्ब

### पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लक्ष घालण्याची केली विनंती

## कॅप्टनला नोकरी नव्हती, तो वैफल्यग्रस्त होता का? अकाउंटेबल, फ्लाईट सेफ्टी मॅनेजरची चौकशी नाही, कंपनी अधिकाऱ्यांवर अत्याचाराचे आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत आमदार रोहित पवार (ठेहळीं झरुरी) यांनी आज आणखी काही खळबळजनक आर-ोप केलेत. दिवंगत अजित दादांच्या अपघातातील विमानाची किंमत ३५ कोटी होती, मात्र विमानाचा विमा २१० कोटींचा होता. तर पायलटचा विमा ५० कोटींचा होता. गुजरातमधील एका गुंतवणूकदाराने तो विकत घेतला. मात्र त्याचा त्यात काही संबंध नाही. सोबतच विमानात जाणीवपूर्वक पेट्रोलचा साठा ठेवण्यात आला होता. तर विमानाचा पायलट हा मानसिक तणावात होता का? त्याला ४ वर्ष नोकरी नव्हती, जेट ऐयरवेजमध्ये जेव्हा हे कपूर कामाला होते तेव्हा त्यांना महिन्याला १०-१२ लाख पगार होता. मात्र अलीकडे त्यांना कुठेही नोकरी न मिळाल्याने त्यांनी व्हीअ-ारएस जॉईन केलं होतं. इथं त्यांना ३ ते ४ लाख महिन्याला पगार मिळत होता. त्यामुळे ते वैफल्यग्रस्त होते, आर्थिक तणावात होते, असं आमचं म्हणणं आहे. असा दावा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. ते दिल्ली येथे पत्रकार परिषदेत बोलत होते.



दरम्यान, यावेळी बोलताना रोहित पवारांनी दिवंगत अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत पुन्हा एकदा पत्रकार परिषद घेत खळबळजनक दावा केला आहे. सोबतच यावेळी व्हीआरएस कंपनीवर काही गंभीर आरोप करत भाजपच्या ट्रॉलर्सलाही खडेबोल सुनावले आहे.

दरम्यान, अकाउंटेबल, फ्लाईट सेफ्टी मॅनेजरची चौकशी झाली का? त्यांना अटक झाली का? या जबाबदार व्यक्ती आहेत. हि व्यक्ती मोठं प्रस्त आहे, म्हणून त्यांना वाचनावण्यात येतंय. यातील एका कंपनी अधिकाऱ्यांवर अत्याचाराचे आरोप आहेत. लायसन्स नसताना अनधिकृतपणे विमान चावण्यात येत होते. तर भाजपचे ट्रोल या पत्रकार परिषदेला ट्रोल करत आहेत. आम्ह-ाला प्रश्न पडतो की भाजपच्या ट्रोलकडून इतका विरोध का? त्या ट्रोलला पैसे कोण देतंय? ते भाजप-ची बाजू मांडत असतात हे आम्ह-ाला माहिती आहे. यांनी पूर्वी रोहित शेट्टींना ब्लॅकमेल केलं होतं. भाजपचे ट्रोल जर विरोध करतात तर मग या कटात भाजपही सहभागी आहे का? अशी शंका निर्माण होते. असेही रोहित पवार म्हणाले.

व्हीएसआर (तडठ) नावाच्या कंपनीला खूप मोठ्या लोकांचा पाठिंबा असून यात सत्तेतील आणि राजकीय संबंध असलेले मोठे उद्य-ोगपती सामील आहेत. हे एक राजकीय किंवा व्यावसायिक कटकारस्थान असू शकते आणि डीजीसीएचे मोठे अधिकारीही यामागे आहेत. अजित दादांना न्याय मिळवून देण्यासाठी या देशातील सर्वात शक्तिशाली व्यक्ती, म्हणजेच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांनीच या तपासात लक्ष दिले पाहिजे, कारण यात गुंतलेले इतर लोकही तितकेच प्रभावशाली आहेत. मी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनाही विनंती करतो की, त्यांनी हा विषय आपल्या हाती घ्यावा आणि नागरी उड्डाण मंत्र्यांचा राजीनामा मागण्यात आम्हाला साथ द्यावी, अशी मागणी देखील रोहित पवारांनी केली आहे.

# शिवजयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

## शिवजन्मोत्सव मंडळ पदाधिकाऱ्यांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : छत्रपती शिवाजी महाराज जयंती सोहळ्यानिमित्त पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील शिवजन्मोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी मीटिंगमध्ये माननीय सहाय्यक पोलीस अधीक्षक साहेब श्री प्रशांत डगळे साहेब यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याबाबत केलेल्या आव्हानाला उत्तम प्रतिसाद देत शिवजन्मोत्सव मंडळाचे पदाधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज जयंती सोहळा निमित्त उत्स्फूर्तपणे रक्तदान शिबिराचे आयोजन केले व त्यामध्ये पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन कडील पोलीस अधिकारी व पोलिस अंमलदार यांनी देखील सहभाग नोंदवला पोलिसांच्या या उपक्रमाला तालुक्यातून कौतुकाची थाप पडत आहे.

शिवजन्मोत्सव मंडळाचे पदाधिकारी यांनी डीजे वाद्य न लावता मौजे अनवली राजनी बाबळगाव अजून सोंड, खर्डी सरकोली, खरसुळी, लक्ष्मी टाकळी, नारायण चिंचोली या गावांमध्ये रक्तदान शिबिराची आयोजन केलेले होते व रक्तदान शिबिरामध्ये पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे अधिकारी व पोलिसांबलदार त्यामध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले विक्रम बनने पुणे हवालदार अभिमन्यू वरण मंगेश रोकडे स्वप्निल वाडदेकर विनायक नलावडे तात्या गायकवाड रमेश बनसोडे सतीश चंदनशिवे यांनी सहभाग नोंदवला आहे.



# पंढरपूर नगरपरिषदेस माझी वसुंधरा अभियानाचा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य शासन यांच्या अंतर्गत पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग तर्फे माझी वसुंधरा अभियान सोहळा आज मुंबई येथे पार पडला.

पंढरपूर नगरपरिषदेस माझी वसुंधरा अभियान या योजनेत ५० ते १लाख लोकसंख्या गटात तृतीय क्रमांक आला असून,सन्मानीत करून नगराध्यक्षा या नात्याने लोकनियुक्त नगराध्यक्षा डॉ.सौ.प्रणिता भगिरथ भालके यांनी पुरस्कार स्वीकारला.

यावेळी महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल आचार्य देवव्रतजी,उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा वहिनी अजित पवार, विधानसभा अध्यक्ष श्री.राहुलजी नार्वेकर,पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडेसाहेब, मुख्य सचिव राजेश अग्रवाल व विविध खात्यातील प्रशासकीय अधिकारी,पंढरपूर नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष, मुख्याधिकारी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# जि. प. शाळा मुळज येथे शिवजयंती निमित्त बक्षीस वितरण

उमरगा/प्रतिनिधी : तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मुळज येथे सार्वजनिक शिवजयंती सोहळा समितीच्या वतीने आयोजित विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रसंगी शाळेतील २०० विद्यार्थ्यांना उन्हाळी टोप्यांचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जोपासण्यात आली.

शिवजयंतीचे औचित्य साधून मुळज येथे चित्रकला, वक्तृत्व, रांगोळी, कथाकथन, गीतगायन, धावणे आणि सुंदर हस्ताक्षर अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमधील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते वही, पेन, स्केचपेन आणि रंगखडू या स्वरूपात बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

### टोपी वाटप सोहळा संपन्न

शिक्षणप्रेमींचा पुढाकार

गावातील शिक्षणप्रेमी श्री. किशोर माडजे, श्री. लहू जाधव आणि श्री. बालाजी बिराजदार यांनी स्वखर्चातून शाळेतील सर्व २०० विद्यार्थ्यांना उन्हाळी टोप्या भेट दिल्या. त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या मदतीबद्दल मुख्याध्यापक श्री. जी. एम. कबाडे व शिक्षक वृंदांच्या वतीने किशोर माडजे व त्यांच्या सहकाऱ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

मान्यवरांची उपस्थिती

या कार्यक्रमास मुख्याध्यापक श्री. जी. एम. कबाडे, सर्व शिक्षक कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलागुणांमुळे कार्यक्रमात रंगत आली. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन करून सोहळ्याची सांगता करण्यात आली.




# वागदरी येथे ग्राम पंचायत व समस्त ग्रामस्थांच्या वतीने शिवजयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागारी/एस.के.गायकवाड : अखंड हिंदुत्वाचे आराध्य दैवत जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंती निमित्त वागदरी ता. तुळजापूर येथे ग्राम पंचायत कार्यालय व समस्त ग्रामस्थांच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करून शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.




प्रारंभी येथील छत्रपती चौकात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवाजी मिटकर गुरुजी व सेवानिवृत्त पोलीस हवालदार संदिपान वाघमारे यांच्या हस्ते पूजन करून भगव्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर सहवाद्य शिव सभागृहात जावून तिथे असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्थाकृती पुतळ्याचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पूजन करून फटाक्याची आतिश बाजी करत शिवरायांना अभिवादन करण्यात आले. शेवटी महाप्रसादाने शिव जयंतीची सांगता करण्यात आली.

या वेळी या कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक भारतीय जनता पार्टीचे तालुका उपप्रमुख किशोर सुरवसे,भाजपाचे बुथ प्रमुख मदन पाटील सरपंच तेजाबाई मिटकर ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पाटील, अमोल पवार माजी उपसरपंच दत्ता सुरवसे, सुरेखाबाई यादव,दीपक धुमाळ,ओम पाटील, बाळू पवार, प्रमोद सोमवंशी,जितेंद्र पाटील धरम सुरवसे युवा कार्यकर्ते अप्पा भंडारे सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अखिल भारतीय मराठा महासंघ युवा शाखेचे उद्घाटन

पंढरपूर/प्रतिनिधी : अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष मा. श्री. अर्जुनराव चव्हाण यांच्या शुभहस्ते बोहाळी ता. पंढरपूर येथे युवा शाखेचे उद्धाटन मोठ्या थाटामाटात पार पडले. अध्यक्षीय भाषणामध्ये अर्जुनराव चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, मराठा युवकांनी राजकारणाच्या पाठीमागे न लागता आपण उद्योजक बनावे तसेच शेतीला जोड व्यवसाय म्हणून वेगवेगळ्या प्रकारचे छोटे-मोठे उद्योगधंदे उभारून आपला व्यवसाय कसा वाढवता येईल याकडे लक्ष द्यावेत. मराठा समाजाने आपली शैक्षणिक प्रगती साधून सारथी तसेच कै.अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ आणि इतर योजनांचा लाभ मोठ्या प्रमाणात घ्यावा. यावेळी सोलापूर जिल्हा युवक अध्यक्ष- शिवाजीराव मोरे यांनी मराठा महासंघाच्या आठ ते नऊ शाखा मोठ्या थाटामाटात काढून तालुक्यातील तसेच जिल्ह्यातील अनेक तरुणांना उद्योजक बनवण्यासाठी प्रोत्साहन दिले. असे कौतुकही चव्हाण यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरेश पाटील, डॉ.उत्तम कुसुमडे, भास्कर कुसुमडे, सर्जेराव जाधव, सतीश कुसुमडे( उपसरपंच), जालिंदर घोडके, नितीन कुसुमडे, रसूल मुलांनी, सुरज बहिरे ,संदीप कुसुमडे कल्याण चव्हाण तसेच विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष- हनुमंत कदम, शहराध्यक्ष- अमोल पवार, शहर उपाध्यक्ष- पांडुरंग शिंदे शाखाध्यक्ष- सागर पवार, उपाध्यक्ष सोहम कुसुमडे, खजिनदार अभिजीत कुसुमडे, सचिव ओंकार कुसुमडे, संघटक समाधान कुसुमडे, कार्याध्यक्ष कल्याण चव्हाण,

सदस्य चंद्रकांत कुसुमडे, शिवेंद्र जाधव, विश्वचित जाधव, हर्षवर्धन कुसुमडे, महेश बोबडे, केशव गोरे, संदीप कुसुमडे,अभिषेक कुसुमडे, पुरुषोत्तम घोडके, प्रज्वल पवार, राज कुसुमडे, कुणाल गुरव, विशाल पांढरे, संदीप पवार, अजित कुसुमडे, इत्यादी तसेच सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# कर्नल भोसले चौक शिवजन्मोत्सव समिती व नागेश भोसले मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने चित्रकला रंगभरण स्पर्धेचे आयोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : करण भोसले चौक शिवजन्मोत्सव समिती व नागेश भोसले मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने चित्रकला आरंभभरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले व छत्रपती शिवरायांच्या जयंती निमित्त राजमाता जिजाऊ उद्यान पंढरपूर येथे दिनांक १९ फब्रुवारी रोजी सकाळी दहा ते बारा या वेळेत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले व कार्यक्रमाचे उद्घाटक अध्यक्ष मा शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत सर, प्रमुख पाहुणे तहसीलदार श्री सचिन लंगोटे साहेब, न.पा.पंढरपूर मुख्याधिकारी श्री महेश रोकडे साहेब, मा. उपनगराध्यक्ष नागेश भोसले, किरण भोसले, युवा सेना अध्यक्ष श्री विश्वजीत भोसले, जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष श्री. पृथ्वीराज या स्पर्धेचेवीर- राज भोसले उपस्थित होते. या स्पर्धेचे सहभागी झालेल्या बाराशे विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र बिस्किटे पुढे देण्यात आले सदर चित्रकला रंगभरण स्पर्धेत परीक्षण कला मंचाचे सदस्य श्री अमित वाडेकर सर, श्री रमेश देवमारे सर, व श्री पांडुरंग शिंदे सर यांनी केली. बक्षीस वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री विश्वंभर पाटील (जिल्हाध्यक्ष कर सल्लागार संघटना) श्री शैलेश भोसले, युवा सेना अध्यक्ष श्री विश्वजीत भोसले व मान्यवर परीक्षकांच्या हस्ते करण्यात आले बक्षीस प्रथम द्वितीय तृतीय उत्तेजनार्थ तीन नंतर काढण्यात आले व बक्षीस म्हणून चित्रकलेचे साहित्य रंगीत कडून पेटी यांचा ट्रॉफी सन्मानचिन्ह प्रमाणपत्र देण्यात आले



कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री काशिनाथ गोगाव सर, चंद्रकांत देसाई सर, राजेंद्र ढवळे सर, सुहास मासा सर, सतीश चंद्रराव सर, पंकज गुरवे सर, तुकाराम खराडे सर, व समिति अध्यक्ष श्री महेश भोसले सर यांनी परिश्रम घेतले.

# नळदुर्गचे सुपुत्र प्रा.राजा सोनकांबळे राष्ट्रीय शिक्षणसेवा पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के .गायकवाड : नळदुर्ग ता.तुळजापूर येथील सुपुत्र व सध्या एस.एन डी.टी.महिला विद्यालय नारायण पेठ पुणे येथे कनिष्ठ प्राध्यापक म्हणून सेवेत कार्यरत असलेले प्रा.राजा रेवाप्पा सोनकांबळे यांना काव्यमित्र संस्था पुणे यांच्या मार्फत दिला जाणाऱ्या राष्ट्रीय शिक्षण सेवा पुरस्काराने शिव जयंती व राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंतीचे औचित्य साधून पिंपरी पुणे येथे सन्मानित करण्यात आले.

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज व स्वच्छतेचे दूत राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंती निमित्ताने काव्यमित्र संस्था पुणे चे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र विमलाई श्रीमंत सगर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १९ फेब्रुवारी २२६ रोजी पिंपरी चिंचवड पुणे येथिल सायन्स पार्क येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यअध्यक्ष विस्तार आधिकारी पंचायत संघटना व्हि.जे. वाघमारे हे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून मातृतीर्थ सिंदखेडराजा राजे लखोजी जाधवराव यांचे चौदावे वंशज संभाजी राजे जाधवराव व संत साहित्याचे गाढे अभ्यासक विजय बोत्रे (पाटील) हे होते. या प्रसंगी काव्यमित्र संस्था पुणे यांच्या वतीने विविध पुरस्काराचे वितरण करण्यात आले.या वेळी एस.एन.डी.टी. महिला विद्यालय पुणे येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले प्रा.राजा सोनकांबळे यांना संभाजीराजे जाधवराव व विजय बोत्रे (पाटील ) यांच्या हस्ते राष्ट्रीय शिक्षणसेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




या प्रसंगी काव्यमित्र संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.संजय जगताप, सचिव हरीनाथ कांबळे सह सर्व काव्यमित्र संस्थे विश्वस्थ, निमंत्रित मान्यवर उपस्थित होते.

त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबदल मित्र परिवारांनी त्यांचे आभिनंदनी केले आहे.

# पेपर फुटला; बारावीचे फिजिक्स अन् केमिस्ट्रीचा पेपर तासाभरापूर्वीच आला...

(पान १ वरून...)

माहिती दिल्यावर पोलिसांनी तपास करून गुन्हा दाखल केलाय. तर मोबाईलमध्ये व्हाट्सअप वर १५ विद्यार्थ्यांचा एक ग्रुप तयार करण्यात आल्याचे आढळून आले आहे. सध्या दोन्ही विद्यार्थनीची चौकशी केली असता खाजगी शिकवणी वर्गातील एका शिक्षकाने पैसे घेऊन पेपर फोडल्याची माहिती दिलीय.

पुण्यातील धायरी परिसरातील एका केंद्रावर चक्क शिक्षकानीच कॉपी पुरविल्याचे उघड झाले आहे. शाळेचा निकाल शंभर टक्के लागावा म्हणून असे प्रकार सुरू असल्याचे बोलले जात आहे.

बुधवारी बारावीचा रसायनशास्त्राचा पेपर होता. येथे नियुक्त शिक्षकाला या शिक्षकाने चिरीमिरी देऊन चहापानासाठी बाहेर पाठवले आणि वर्गाचा ताबा घेत विद्यार्थ्यांना केमिस्ट्रीच्या पेपरला लागणारे लाँगबुक वाटून कॉपी करण्यास प्रवृत्त केले. आता हा सगळा प्रकार विद्यार्थ्यानेच पालकाला सांगितले. घडलेल्या प्रकरणानंतर आता बोर्डाने या शिक्षकावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या उभारणीवरून चिखला गावात तीव्र वाद

## (उबाठा) शिवसेनेच्या महिला उपजिल्हाप्रमुख संजीवनी वाघ यांना मारहाण





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघात येत असलेल्या लोणार तालुक्या अंतर्गत येणाऱ्या मौजे चिखला गावातील(उबाठा) शिवसेनेच्या महिला उपजिल्हाप्रमुख संजीवनी वाघ यांना मारहाण झाल्याची माहिती समोर आली आहे.छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या उभारणीवरून चिखला गावात तीव्र वाद उफाळून आला असून, या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आहे. गावातील महिलांमध्ये प्रचंड हाणामारी झाली. या घटनेत उबाठा शिवसेनेच्या महिला उपजिल्हाप्रमुख संजीवनी वाघ यांना मारहाण झाल्याची माहिती समोर आल्याने. घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या एक दिवस अगोदर गावातील एका खुल्या जागेवर अज्ञात व्यक्तींनी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला होता. मात्र, ही जागा गावातील विविध सामाजिक व कौटुंबिक कार्यक्रमांसाठी विशेषतः लग्नसमारंभासाठी वापरली जात असल्याने, पुतळा ग्रामपंचायतीच्या जागेत उभारावा, अशी मागणी ग्रामस्थांच्या एका गटाने केली होती. याबाबत ग्राम पंचायतीकडे निवेदन देण्यात आले होते. तरीही पुतळा हलवण्यात न आल्याने वाद चिघळला. यामध्ये संजीवनी वाघ यांना मारहाण झाल्याचे व्हिडिओ व्हायरल झाले असून संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन दोशींवर कठोरात कठोर कार्यवाही करावी अशी मागणी करण्यात आली आहे. गावात मराठ्यांची संख्या कमी असली तरी आव्हान केले तर बुलढाणा जिल्ह्यात मराठ्यांना बसण्यास जागा राहणार नाही असे यावेळी त्यांनी सांगितले. येत्या २५ फेब्रुवारी पर्यंत आरोपीला अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी प्रशासनाला विनंती केली आहे. अन्यथा २५ तारखेनंतर महाराष्ट्रभर मोठे आंदोलन करण्यात येईल असा इशाराही त्यांनी दिला आहे.

**घटनास्थळी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील घटनास्थळी दाखल; चिखला येथे घडलेल्या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करा : आमदार मनोज कायंदे**

या घटनेच्या निषेधार्थ जिल्ह्यातील विविध ठिकाणी बंद पुकारण्यात आला आहे..

यावेळी परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी जिल्ह्यातील पोलिसांचा फौजफाटा मोठ्या प्रमाणावर तैनात होता.

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त धाराशिव जिल्हा प्रेस क्लब शाखा कळंब अंतर्गत कळंब शहरामध्ये उपक्रम










**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : रयतेचे राजे, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त कळंब शहरांमध्ये अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद मुंबई संलग्न धाराशिव प्रेस क्लब शाखा कळंब यांच्या वतीने, अन्नदान, पाणी बॉटल,व रक्तदान शिबिर याचे आयोजन करण्यात आले होते.

५०० लोकांचे अन्नदान, १४०० पाणी बॉटल, व रक्तदान शिबिर राबवण्यात आले होते.

त्यामध्ये १७ रक्तदात्याने रक्त दान करून कळंब शहरामध्ये आलेल्या शिवभक्ताने भरभरून प्रतिसाद दिला,

या कार्यक्रमाचे उद्घाटन गणेश शिंदे साहेब उपविभागीय अधिकारी कळंब यांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमाला उपस्थित म्हणून कळंबचे तहसीलदार हेमंत ढोकले साहेब, नायब तहसीलदार तापडिया साहेब, कळंब पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अजित चिंतले साहेब, सहाय्यक पोलीस निरीक्षक मगर साहेब, वारकरी संप्रदायाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ, धाराशिव प्रेस क्लबचे जिल्हाध्यक्ष रहीम शेख, तालुका पत्रकार संघाचे विश्वस्त सतीश बप्पा टोणगे, माजी नगरसेवक प्रताप मोरे, ज्येष्ठ पत्रकार माधव सिंग राजपूत, रेणुका इन्स्टिट्यूट चे सर्वेसर्वा शरद जादवर, मंडल अधिकारी जगताप साहेब, न्यूज १८ चे जिल्हा प्रतिनिधी बालाजी निरफळ, पत्रकार, शितल कुमार धोंगडे प्राचार्य जगदीश गवळी, समाजसेविका ज्योतीताई सपाटे, समाजसेवक बौधराज( अण्णा) रणदिवे.

हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी पत्रकार, सुधाकर रणदिवे, पत्रकार, अमर चोंदे, पत्रकार, शिवप्रसाद बियाणी, पत्रकार, राहुल गाडे, पत्रकार, सतीश तवले, पत्रकार,अझहर पठाण, पत्रकार,राजेंद्र बारगुले, पवन बोबडे, व ज्याने बाल वयात मनापासुन शिवभक्तांची सेवा केली असे पत्रकार अमर चोंदे यांचे ८ वर्षाचे चिरंजीव शिवकुमार चोंदे या सर्वांचे सहकार्य लाभले.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दरेगाव येथे शिवजयंती साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेडराजा तालुक्यातील दरेगाव येथे जि.प. म. प्राथमिक शाळांमध्ये महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या थाटामाटात उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी अध्यक्ष स्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री संदिप डोंगरे तर प्रमुख पाहुणे शालेय व्यवस्थापन समिती चे उपाध्यक्ष तथा पत्रकार श्री.राहुल साबळे तर प्रतिष्ठित नागरिक व शालेय व्यवस्थापन समिती चे सदस्य श्री . आत्माराम बंगाळे पत्रकार .रामदास काळुसे प्रामुख्याने उपस्थित होते. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे प्रमुख पाहुण्यांनी व अध्यक्षांनी पुष्पहार अर्पण करून छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करण्यात आला यावेळी काही मुलींनी मा जिजाऊचा वेशभूषा धारण करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. विद्यार्थानी आपले मनोगत व्यक्त केले. शाळेचे मुख्याध्यापक श्री.इंगळे सर शालेय व्यवस्थापन समितीचे

अध्यक्ष.उपाध्यक्ष सदस्य व गावातील आदी मान्यवर कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक श्री.बबन इंगळे सर यांनी केले तर आभार अर्चना खिल्लारे मँडम यांनी मानले.

# वाशी येथील जगदाळे मामा प्राथमिक विद्यामंदिर वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वाशी प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : वाशी येथील जगदाळे मामा प्राथमिक विद्यामंदिर या शाळेमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले, हा कार्यक्रम शाळेच्या प्रांगणात संध्याकाळी घेण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी १ ली ते ७ वीच्या विद्यार्थी/ विद्यार्थिनींनी मोठ्या प्रमाणात व उत्साहात सहभाग घेतला होता. या कार्यक्रमामध्ये एकूण ५३ विद्यार्थी कलाकाराने सहभाग घेतला होता. व ३३ प्रकारचे सादरीकरण करण्यात आले होते.

या कार्यक्रमांमध्ये नृत्य, गायन, मुकअभिनय, गायन, विनोदी नकलांचे प्रात्यक्षिकाचे सादरीकरण करून, इतर प्रकारच्या वेशभूषा करून जमलेल्या पालकांची मने जिंकली, तसेच पालकांनी सुद्धा आपल्या मुलांच्या कलेला वाव देत टाळ्यांच्या गजरात व बक्षिसाच्या स्वरूपात स्वागत केले.

या कार्यक्रमाचे बऱ्याच वर्षांनी नियोजन केल्यामुळे पालकांनी सुद्धा याचा आनंद व्यक्त केला.

या कार्यक्रमाचा उद्देश आपल्या विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या कलागुणांना वाव देणे, विद्यार्थ्यांची बोलण्याची शैली त्यांचा आत्मविश्वास, त्यांचे विविध प्रकारचे सुप्त गुण, दिसून आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून वाशी नगरपंचायत चे बांधकाम सभापती राजूभैया कवडे तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी मुख्याध्यापक घोरपडे सर हे होते, तसेच जेआय आरटी चे मुख्याध्यापक श्री बामणे सर, शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा ज्योती रुपेश सुकाळे, त्रिशला देशमुख, स्वप्निल कवडे, लोककलावंत हिरोचंद सुकाळे, सदाशिव कांबळे, रोहेद शेख, व इतर मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.लगाडे के. जी व विद्यार्थी सुयश किरण बनसोडे, यांनी केले. हा कार्यक्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री शिंदे एस एस, यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडला,

या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री लगाडे सर यांनी केले. व शेवटी अध्यक्षांच्या सहानुमतीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी शहरातील पालक वर्ग तरुण वर्ग विद्यार्थी/ विद्यार्थिनी, व विशेष महिलांनी मोठया प्रमाणात हजेरी लावली.

# खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत बाल आनंद मेळावा उत्साहात साजरा



खामसवाडी/प्रतिनिधी : हनुमंत पाटुळे दि.२० कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दि.२० फेब्रुवारी २०२६ रोजी बाल आनंद मेळावा मोठ्या उत्साहात साजरा झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन गावचे सरपंच श्री अमोल पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य तसेच गावातील पत्रकार बंधू, पालक व शिक्षण प्रेमी नागरीक यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये विविध प्रकारचे एकूण ७० स्टॉल विद्यार्थ्यांनी लावले होते. यामध्ये खाद्य स्टॉल, भाज्या, फळे, गृहपयोगी वस्तूंचे दुकाने यांचा समावेश होता. या बाल आनंद मेळाव्यातून विद्यार्थ्यांना दैनंदिन व्यवहार कसा करावा याचे धडे मिळाले. यातून त्यांच्यात व्यवहारिक मूल्यांची रुजवणूक व्हावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात विद्यार्थ्यांनी खरेदी विक्रीचा आनंद मोठ्या आनंदाने घेतला. या बाल आनंद मेळाव्यात एकुण ५० हजार रुपयाची उलाढाल झाली.या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी गावचे सरपंच श्री अमोल पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्रीमती रोहिणी माळी, उपाध्यक्ष श्रीमती भाग्यश्री रोहिले, सदस्य सोमनाथ हिरे,भागवत सुर्यकांत शेळके, महेश शेळके,अमोल रोहिले तसेच गावातील पत्रकार श्री. गोपाळ शेळके, श्री. हनुमंत पाटुळे, श्री. दीपक सावंत, श्री. शिवाजी बोबडे यांच्या सह गावातील पालक, नागरिक, महिला उपस्थित होत्या. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी तसेच गावातील नागरिक व महिलांनी या बाल आनंद मेळाव्यातील वस्तू खरेदी करून आनंद घेतला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री.मोरे सुरेश शिक्षक श्री बाकले शिवराज, शेळके नागनाथ, गायकवाड विश्वास,लोखंडे सातलिंग, श्रीमती संगीता किरदत्त, रेखा रितापुरे, वैशाली मुळे यांनी परिश्रम घेतले.

**बाल आनंद मेळाव्यातून ५० हजार रुपयाची उलाढाल**

**योग्य उपचार व प्रतिबंधात्मक उपायांविषयी दिली सविस्तर माहिती**

# निफाड उपजिल्हा रुग्णालयात श्री गुरु तेग बहादुर साहेब जी यांच्या ३५० व्या शहीद समागमच्या निमित्ताने मोफत आरोग्य शिबिर




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

निफाड उपजिल्हा रुग्णालय येथे जिल्हा शल्यचिकित्सक व निवासी वैद्यकीय अधिकारी, जिल्हा रुग्णालय नाशिक यांच्या आदेशानुसार वैद्यकीय अधिक्षक डॉ राजीव तांभाळे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री गुरु तेगबहादुर साहिब जी ३५० व्या शहिदी समागमच्या निमित्ताने मोफतआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यातआले होते.

डॉ राजीव तांभाळे व उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते दीप प्रज्ज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रस्तावांना करतांना औषध निर्माण अधिकारी पराग चव्हाण यांनी केली असून श्री गुरु तेग बहादुर साहिब बाबत सांगितले की गुरु तेगबहादुर हे शीख धर्मातील नववे गुरु होते. त्यांना 'हिंदवी चादर' ही उपाधी देण्यात आली. 'हिंदवी चादर' म्हणजे हिंदुस्थानातील धर्म, संस्कृती आणि मानवी स्वातंत्र्य यांचे संरक्षण करणारी ढाल. श्री गुरू तेग बहादुर हे लहानपणापासून शूर, धैर्यवान व अध्यात्मिक प्रवृत्तीचे होते..... तसेच 'हिंदवी चादर' ही उपाधी बाबत सांगताना सांगितले की मुघल सम्राट औरंगजेब याच्या कारकीर्दीत जबरदस्तीने धर्मांतराचे प्रकार सुरू होते. काश्मिरी पंडितांनी मदतीसाठी गुरु तेगबहादुरांकडे धाव घेतली. धर्मस्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी गुरुजींनी स्वतःचे बलिदान देण्याचा निर्णय घेतला. त्यांनी कोणत्याही धर्माचा अपमान न करता सर्वांच्या श्रद्धेचे संरक्षण केले. म्हणूनच त्यांना हिंदवी चादर म्हणजे हिंदुस्थानच्या धर्मरक्षणाची ढाल असे संबोधले जाते.

वैद्यकीय अधिक्षक डॉ राजीव तांभाळे यांनी आपल्या मनोगतात श्री गुरु तेगबहादुर यांनी केलेले कार्य व संदेश बाबत सांगितले की त्यांनी सर्व धर्मांचा आदर मानवता, सहिष्णुता व सत्यासाठी लढा अन्यायाविरुद्ध न झुकणे तसेच गुरु तेगबहादुर यांचे बलिदान हे केवळ शीख धर्मासाठी नव्हे, तर संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे.

आरोग्य शिबिराबाबत माहिती देताना सांगितले की नागरिकांना आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात आले. नियमित आरोग्य तपासणी, संतुलित आहार, स्वच्छता, लसीकरणाचे महत्त्व, तसेच संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांबाबत माहिती देण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांनी उपस्थितांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देत योग्य उपचार व प्रतिबंधात्मक उपायांविषयी सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याचा उद्देश असल्याचे वैद्यकीय अधीक्षक यांनी सांगितले. भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करून समाजामध्ये आरोग्यविषयक जनजागृती वाढविण्याचा मानस व्यक्त केला..

कार्यक्रमाच्या यशस्वी करण्यासाठी एन सी डी विभाग व रुणालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी, इन्चार्ज सिस्टर, कर्मचारी वर्ग यांनी परिश्रम घेतले. उपस्थित नागरिकांनी उपक्रमाचे कौतुक केले.

# अक्कलकोटच्या शिरपेचात मानाचा तुरा

## माझी वसुंधरा अभियानात महाराष्ट्रात द्वितीय क्रमांक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्र शासन आणि पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या सयुक्त विद्यमाने मुबंईतील वरळी येथील लाला लजपत राय म ार्गावरील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे आयोजित करण्यात आलेल्या 'माझी वसुंधरा अभियान सन्मान सोहळा - ५.०' या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचा सन्मान मिळाला!

आपल्या अक्कलकोट नगरपरिषदेला महाराष्ट्रात द्वितीय क्रमांकाचे व भूमी घटकास विशेष पारितोषीक व उंच उडी प्रकारात पारितोषीक मिळाले आहे. यात सन्मानचिन्ह, मानपत्र आणि सहा कोटी पन्नास लाख रुपयांच्या धनादेशाचा सम ावेश होता! अक्कलकोट नगरपरिषदेचे नागरिक, प्रशासनाचे अधिकारी आणि पदाधिकारी यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळेच हे शक्य झाले. कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल महामहिम श्री. आचार्य देवव्रत, उपमुख्यमंत्री माननीय श्रीमती सुनेत्राताई




अजित पवार, विधानसभा अध्यक्ष श्री. राहुलजी नार्वेकर, महाराष्ट्राच्या पर्यावरण मंत्री माननीय पंकजाताई मुंडे, राज्याच्या मुख्य सचिव मा. जयश्री भोज, आयुक्त मा. प्रवीण देवरे, राज्यपाल सहसचिव श्री.राममुर्ती, अक्कलकोट नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. रमाकांत डाके, उपनगराध्यक्ष श्री. ऋतुराज राठोड, मध्य मंडलचे अध्यक्ष श्री. प्रदिप पाटील, श्री. प्रशांत भगरे, श्री. विशाल चव्हाण, श्री. नितीन शेंडगे, श्री. भागवत पवार, श्री. शुभम माने उपस्थित होते.

# सुपतगावमध्ये 'छत्रपती युवा प्रतिष्ठान'तर्फे शिवजयंतीचा जागर; विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांनी सोहळा संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी :

सुपतगाव येथील 'छत्रपती युवा प्रतिष्ठान' च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांनी साजरी करण्यात आली. या सोहळ्याच्या माध्यम ातून शिवरायांच्या विचारांचा जागर करत सामाजिक बांधिलकी जपण्याचा आदर्श प्रतिष्ठानने ग्राम स्थांसमोर ठेवला.

उत्सवाची सुरुवात भव्य मोटारसायकल रॅलीने झाली, ज्यामुळे संपूर्ण गाव शिवमय झाले होते. विद्यार्थ्यांमध्ये शिवचरित्राचा वारसा रुजवण्यासाठी आयोजित 'शिवज्ञान परीक्षेत' सुयश मि ळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी विशेष गौरव करण्यात आला. तसेच, गावातील ज्या तरुणांनी शासकीय सेवेत निवड होऊन गावाचे नाव उज्ज्वल केले, त्यांचाही सन्मान याप्रसंगी करण्यात आला.

कार्यक्रमात वक्तृत्व स्पर्धे च्या माध्यमातून बालशिवबांनी आपल्या विचारांनी उपस्थितांची मने जिंकली. सायंकाळी शिवशाहीर यांच्या पोवाड्यांनी अंगावर शहारे आणले, तर रक्तदान शिबिराच्या माध्यमातून सामाजिक कर्तव्य पार पाडण्यात आले. सर्व शिवभक्तांसाठी म ाळसा कुंभार यांनी महाप्रसादाचे देखील चोख नियोजन करण्यात आले होते. दिवसाची सांगता छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य मिरवणुकीने करण्यात आली.

या संपूर्ण सोहळ्याचे नेटके सूत्रसंचालन पुरोषोत्तम मुळे व मोहन गुरव यांनी केले, तर उपस्थितांचे आभार भालचंद्र मातोळे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष महादेव भोईटे, आप्प-ाराव मुळे ,सिद्धेश्वर माने, बळी भोईटे, कालिदास भुजबळ, युवराज माने , नितीन शिंदे, परम ेश्वर भुजबळ , मल्लिनाथ मात-ोळे, बालाजी मुळे, इंद्रजीत मुळे , नारायण शिंदे, ज्ञानेश्वर शिंदे, गुलचंद मातोळे, सतीश माने, सतीश मुळे, गोपाळ पाटील, नागनाथ शिंदे , विष्णु शिंदे, गणेश मुळे, ओमकार मात-ोळे, ओमकार शिंदे, लिंबराज भुजबळ, आकाश रणखांब , यांच्यासह छत्रपती युवा प्रतिष्ठानच्या सर्व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. या सोहळ्याला सुपतगावमधील शिवाभक्तांनी,अबालवृद्धांनी म ोठी उपस्थिती दर्शविली होती.

# खानिवली कृषी तंत्र विद्यालयात काथ्या उद्योग जनजागृती कार्यशाळा संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : कॉयर बोर्ड, भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयांतर्गत प्रादेशिक कार्यालय कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी तंत्र विद्यालय खानिवली, तालुका भिवंडी येथे काथ्या (कॉयर) उद्योग जनजागृती विषयावर एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांसह परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कार्यशाळेदरम्यान कॉयर बोर्ड कणकवलीचे प्रादेशिक अधिकारी श्रीनिवास बीटलींगु यांनी काथ्या उद्योगाचे विविध उपयोग, उत्पादन प्रक्रिया आणि उद्योगाच्या व्यावसायिक संधींबाबत सविस्तर माहिती दिली. काथ्यापासून तयार होणाऱ्या दोरखंड, चटई, गादी, सजावटी वस्तू आणि शेतीसाठी उपयुक्त साहित्य यांसारख्या विविध उत्पादनांची माहिती देत हा उद्य-ोग कमी गुंतवणुकीत सुरू करता येतो, असे त्यांनी सांगितले. तसेच हा उद्य-ोग सुरू करण्यासाठी केंद्र सरकारच्या विविध योजना उपलब्ध असून, त्या योजनांसाठी अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे आणि आर्थिक सहाय्य मिळविण्याच्या पद्धतीबाबतही त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या माध्यमातून ग्रामीण भागातील युवकांनी स्वावलंबी बनून रोजगार निर्मिती करावी, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी कृषी तंत्र विद्यालयाचे प्राचार्य मिलिंद घरत यांनी काथ्या उद्य-ोग हा पर्यावरणपूरक असून ग्रामीण भागातील युवकांसाठी रोजगाराच्या उत्तम संधी निर्माण करणारा उद्योग आहे, असे सांगितले. शाश्वत विकासाच्या दृष्टीने अशा उद्योगांना विशेष म हत्त्व असल्याचे त्यांनी नमूद केले.

### काथ्या उद्योगांचे नागरिकांनी गिरवले धडे

कार्यशाळेला उपप्राचार्य जितेंद्र खरे, खानिवली ग्रामपंचायतीचे पंचायत अधिकारी हेमंत वेखंडे, सरपंच निकिता दळवी, सुषमा साखरे, स्वामी यांच्यासह विद्या-र्थी, ग्रामस्थ आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यशाळेमुळे उपस्थितांना काथ्या उद्योगाबाबत नवीन माहिती मिळाली असून, ग्रामीण भागात उद्योग उभारणीसाठी प्रेरणा मि ळाल्याची भावना सहभागींकडून व्यक्त करण्यात आली.

# रसलपुर शाळेमध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : रसलपुर जिल्हा परिषद शाळेमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती विविध कार्यक्रमांनी मोठ्या उत्स-ाहात साजरी करण्यात आली.

.याप्रसंगी जी,प शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे गाण्यांवरती नृत्य केले असून चि. राणा निखिल निकाळे. सुरज न्यानेश्वर पवार यांनी शोभांच्या भूमिका साकार केल्या कार्यक्रम ाची सुरुवात छत्रपती शिव-



ाजी महाराजांचे प्रतिमा पूजनाने करण्यात आली. शिवयोद्धा ग्रुप व मित्र परिवाराने महापुरुषांच्या २२ प्रतिमा जिल्हा परिषद शाळेत सप्रेम भेट दिल्या असून या कार्यक्रमासाठी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सिम्बॉल ऑफ नॉलेज संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राकेश निकाळे तसेच ग्रामस्थ निवृत्ती भोसले, प्रशांत गोसावी, सुभाष सातभाई, बाळासाहेब निकाळे, मधुकर निकाळे , विजय मोरे, गोकुळ कुंदे, शामा सातभाई, राकेश पीठे, निखिल निकाळे, संकेत निकाळे, रोशन नन्नवरे, लक्ष्मण गांगुर्डे, आकाश गोसावी, नितीन भगुरे, सात्विक निकाळे जिल्हा परिषद शाळा निफाड नंबर एकचे मुख्याध्यापक निलेश शिंदे व शिंदे मॅडम तसेच अंगणवाडी शिक्षिका जयश्री निकाळे, ललिता पवार, अशा सेविका संगीता गांगुर्डे तसेच शाळेतील शिक्षक सुळ सर, बैरागी मॅडम, निकाळे मॅडम विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते सूत्रसंचालन सुळ यांनी केले.

# कळंब बस आगारात शिवजयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती १९ फेब्रुवारी २०२६ रोजी कळंब बस आगार येथे म ोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्त आयोजित कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून धाराशिव जिल्हा शिवसेनेचे अध्यक्ष अजित दादा पिंगळे, संभाजी ब्रिगेडचे मराठवाडा प्रदेश संघटक अतुल भैय्या गायकवाड, शिवसेना तालुकाध्यक्ष लक्ष्मीकांत हुलजुते, सामाजिक कार्यकर्त्या ज्योतीताई सपाटे, ॲड.अशोक चोंदे कळंब बस आगार व्यवस्थापक अलकुंटे, वाहतूक नियंत्रक निलेश जाधव, पायाळ, यांची उपस्थिती होती, या प्रसंगी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात



आला.

यानंतर प्रमुख पाहुणे अजित दादा पिंगळे यांनी बस आग-ारातील कर्मचाऱ्यांचा सामाजिक उपक्रमात सहभाग असतो असे सांगून कळंब बस आगारासाठी चार्जिंग सेंटरची काम पूर्ण झाले की इलेक्ट्रिक बस सेवा सुरू होत आहे. तसेच कळंब बसस्थानकाचे नवीन इमारत बांधकाम लवकरच टेंडर निघणार असून आपल्या जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक परिवहन मंत्री असल्याने हे काम सुरू होत आहे असे सांगितले. तर अतुल गायकवाड यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती महाराजांच्या विच-ारा प्रमाणे साजरी करण्यात यावी, असे सांगितले. ज्योतीताई सपाटे यांनी शिवप्रेमी बाळासाहेब आ-वारे पाटील यांच्याकडून छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व महापुरुषांचे पुतळे बसविण्यात येत आहेत आपण मागणी केल्यास आपल्या गावासाठी पुतळा देण्यात येईल यासाठी संपर्क करावा असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बळीराम कवडे महाराज यांनी केले यानंतर शालेय बालकांची छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्यावर भाषणे झाली.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे ह.भ.प. बळीराम कवडे महाराज, आशा राऊत , व्याख्याते प्राचार्य महादेव गपाट, माधवसिंग राजपूत यांच्या हस्ते रजिस्टर कंपास पेटी प्रोत्साहन पर बक्षीस म्हणून देण्यात आले. याप्रसंगी सूत्रसंचालन राजकन्या गवळी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी म नोज लांडगे, आबासाहेब चौधरी, गणेश काळे, महेश थोरबोले, सीमा भिसे, कल्पना सोनवणे अशोक वटाणे यांनी परिश्रम घेतले.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची खा. धैर्यशील मोहिते पाटील यांनी घेतली भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी ठाणे येथे सदिच्छा भेट घेऊन माढा लोकसभा मतदारसंघातील विविध प्रलंबित विकास कामांबाबत सविस्तर चर्चा केली.

या बैठकीत माढा लोकसभा मतदारसंघातील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (चडठऊ) अंतर्गत प्रलंबित रखडलेल्या रस्ते व पुलांच्या कामांमुळे वाहतूक कोंडी, अपघाताचा धोका तसेच नागरिकांना होणाऱ्या अडचणींबाबत खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी मंत्री महोदयांचे लक्ष वेधले व प्रलंबित कामांना तातडीने पूर्ण करणे निर्देश द्यावे म्हणून विनंती केली. तसेच मतदारसंघातील अकलूज, करमाळा, माढा व नातेपुते येथील नगरपरिषद व नगरपंचायती अंतर्गत पाणीपुरवठा, रस्ते, ड्रेनेज, अंतर्गत गटार योजना, सार्वजनिक सुविधा व नागरी विकासाशी संबंधित विविध विकास कामांचे निवेदन दिले व तातडीने मंजुरी देण्यात यावी म्हणून विनंती केली.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व प्रस्तावांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून संबंधित विभागांना त्वरित कार्यवाहीचे निर्देश देण्याचे आश्वासन दिले. या भेटीमुळे माढा लोकसभा मतदारसंघातील प्रलंबित विकासकामांना गती मिळणार असून नागरिकांना लवकरच दिलासा मिळेल, असा विश्वास खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी व्यक्त केला.

### नागरिकांसाठी एकाच ठिकाणी १५ हून अधिक सुविधा

### प्रलंबित प्रकरणांच्या निपटाऱ्याला गती देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न

# निफाड तालुक्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

निफाड : नागरिकांना महसूल विभागाच्या सेवा त्यांच्या गाव-ातच, सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी निफाड तालुक्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान (टप्पा-१)' राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून एकाच ठिकाणी १५ हून अधिक महसुली सुविधा उपलब्ध करून देत प्रलंबित प्रकरणांच्या निपटाऱ्याला गती देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे.

अलीकडच्या काळात विविध प्रम ाणपत्रे, फेरफार, अकृषिक परवानग्या आदी कामांसाठी नागरिकांना तहसील कार्यालयात वारंवार फेऱ्या माराव्या लागत असल्याची बाब लक्षात घेऊन 'शासन आपल्या दारी' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी हे अभियान हाती घेण्यात आले आहे. नागरिकांचा वेळ, खर्च आणि गैरसोय कमी करत पारदर्शक व कार्यक्षम सेवा देण्याचा यामागील उद्देश आहे.

शिबिरस्थळी तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित राहून अर्ज स्वीकृती, कागदपत्रांची तपासणी आणि तत्काळ कार्यवाही करणार आहेत. आवश्यक कागदपत्रे पूर्ण असल्यास अनेक सेवा त्याच दिवशी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राहणार आहे.

**शिबिरातील प्रमुख सेवा**

या अभियानांतर्गत प्रलंबित फ ेरफार प्रकरणांचा निपटारा, ७/१२ उताऱ्यातील चुकांची दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे ७/१२ व ८-अ उतारे वितरण, उत्पन्न, रहिवासी व जात प्रमाणपत्र, नॉन-क्रिमिलियर प्रमाणपत्र आदी सेवा दिल्या जाणार आहेत. तसेच अकृषिक (छ) पर-वानगी संदर्भातील मार्गदर्शन, नवीन व्यवस्थापनानुसार 'सनद' प्रक्रियेची माहिती, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ मंजुरी, विद्यार्थ्यांसाठी विविध दाखले वितरण, तुकडेबंदी कायद्याच्या उल्लंघन प्रकरणांचा निपटारा, घरांसाठी पट्टे वाटप व ई-म ोजणी अर्ज स्वीकृती यांचाही समावेश आहे.

याशिवाय ॲग्रीस्टॅक व पीएम किसान नोंदणी, भूसंपादन व अकृषिक परवानगी प्रकरणी 'कमी-जास्त पत्रके' तयार करून गाव दप्तर अद्ययावत करण्याचे कामही शिबिरात हाती घेतले जाणार आहे.

या उपक्रमामुळे विशेषतः शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून महसूल विभागाच्या सेवांबाबत थेट मार्गदर्शन मिळाल्याने अनेक शंका-समस्यांचे निराकरण जागेवरच होणार आहे.

प्रांताधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांनी सांगितले की, नागरिकांना वेळेत आणि पारदर्शक सेवा देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. या अभियानामुळे प्रलंबित प्रकरणांचा जलद निपटारा होईल. प्रत्येक गावात सेवा पोहोचवून शासनाबद्दलचा विश्वास दृढ करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनीही नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह शिबिरात उपस्थित रा-हावे. बहुतांश सेवा त्याच दिवशी देण्याचे उद्दिष्ट आहे. शेतकरी, विद्या-र्थी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी हे अभियान अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

निफाड तालुक्यातील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या विशेष महसूल समाधान शिबिराचा लाभ घ्यावा, असे आ-वाहन महसूल विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. प्रशासन आणि नागरिक यांच्यातील विश्वास अधिक दृढ करणारा हा उपक्रम ठरणार आहे.